सुराज्य सोलापूर
रविवार, दि. ९ नोव्हेंबर २०२५

# वार-पलटवार; सच क्या झूठ क्या?
# मोहोल की जनता जानती है सबकुछ!

सोलापूर/खास प्रतिनिधी

राजन पाटील आणि उमेश पाटील यांच्यामधील मिटण्याऐवजी वाढत चाललेलं राजकीय हाडवैर, टोकाला गेलेला कडवा संघर्ष, अनगर पाटील परिवाराचा भाजप प्रवेश, 'स्थानिक'च्या निवडणुकांवरुन तापलेलं राजकीय वातावरण यामध्ये आता पीडित उज्वला थिटे-पाटील या अनगकर महिलेच्या प्रकरणावरुन उमेश पाटील आणि माजी आमदार यशवंत माने यांच्यामध्ये वार-पलटवार सुरु झाले आहेत. वाफळेच्या सभेत मानेंनी उज्वला थिटेंचं नाव घेऊन आमदार राजू खरे आणि उमेश पाटील यांचं वस्त्रहरण करत या दोघांच्या पायात जणू साप सोडले. त्यावर उमेश पाटील प्रचंड भडकले. मानेंच्या वारांवर जोरदार पलटवार करत पाटील यांनी त्यांची अक्षरश: लाज काढली. मोहोळ तालुक्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनी राजकीय आखाडा तापला असतानाच यशवंत माने आणि उमेश पाटील यांच्यात कडवं शाब्दिक युद्ध रंगलं आहे.





## राजन पाटील, यशवंत माने अन् उमेश पाटलांमध्ये उफाळला पुन्हा वाद

## राजू खरेंसह राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्षांवर जहरी घणाघात

## रान पेटवलेल्या उज्वला थिटे-पाटलांचं मानेंना 'ओपन' चॅलेंज

### वाफळेच्या सभेत नेमकं काय म्हणाले होते यशवंत माने?

वाफळे (ता. मोहोळ) येथील सभेत माजी आमदार यशवंत माने म्हणाले की, राजन पाटील आणि यशवंत मानेंवर आरोप करण्यासाठी उज्वला थिटे यांना उमेश पाटील आणि राजू खरे यांनी ५० लाखांची ऑफर दिली होती. त्यानंतर संबंधित उज्वला थिटे या महिलेने आपल्या मुलासाठी इनोव्हा गाडी आणि दहा लाख रुपये मागितले होते, असा आरोप यशवंत मानेंनी केला होता. २५ ऑक्टोबर २०२४ ला थिटे आपल्या मुलासह पुतण्याच्या कार्यालयात आल्या होत्या, त्यावेळी त्यांनी ही मागणी केली होती, असा दावा माने यांनी केला आहे. उज्वला थिटे यांना उघडं पाडण्याचा प्रयत्न अनगर नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरख मानेंनी केल्याची चर्चा सुरु झाली.

### उमेश पाटलांनी मानेंना घेतलं शिंगावर

वाफळेच्या सभेमधील मानेंच्या वक्तव्यानंतर उमेश पाटलांनी जोरदार 'प्रहार' केला. त्यांनी आली अंगावर घेतली शिंगावर याप्रमाणं मानेंवर पलटवार केला. ते म्हणाले, अनगरमधील उज्वला थिटे यांच्या घरावरील दरोड्याप्रकरणी राजन पाटील आणि त्यांच्या दोन्ही मुलांचे नाव फिर्यादीमध्ये असूनही यशवंत मानेंच्या दबावापोटी त्यांच्यावर गुन्हा दाखल होऊ शकला नव्हता. त्याचा जाब विचारण्यासाठी थिटे ह्या माजी आमदार यशवंत माने यांच्याकडे गेल्या होत्या आणि तुम्ही तिच्यावर पैसा घेतल्याचा आणि मागितल्याचा उलटा आरोप करता, तुम्हाला लाज वाटली पाहिजे.

### 'त्या'महिलेस गावात येऊ देत नाही, तिच्यावर धुणं-भांडी करण्याची वेळ...

तुम्ही त्या महिलेला आज गावात राहायला येऊ देत नाही. तिची अनगर गावात तीस एकर बागायती जमीन आहे. पण आज तिच्यावर धुणं-भांडी करायची वेळ आली आहे. ती पुण्यात राहते आणि मुलगा एका गाडीवर ड्रायव्हर म्हणून काम करत आहे. आमच्याकडून तिला ५० लाख रुपये मिळाले असते तर तिच्या मुलावर ड्रायव्हर म्हणून काम करायची वेळ आली असती का? झोपडीवजा छोट्या घरात राहायची वेळ तिच्यावर आली असती का? असा सवालही उमेश पाटील यांनी केला.

### शेती जाळून टाकली, घरावर दरोडा, मुलाला आयुष्यातून उठवलं तरीपण...

मुळात उज्वला थिटेंच्या मुलाला अमानुष मारहाण करून त्याच्यावरच अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला. तसेच, त्यांच्या मुलाला बारावीच्या परीक्षेला बसू दिलं नाही. त्याच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर नियमात नसतानाही या मुलावर अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल असल्याने त्याला कुठेही प्रवेश दिला जाऊ नये, असा उल्लेख केला. संबंधित मुलाला आयुष्यात कोठेही शिक्षण घेता येऊ नये, असा शेरा त्याच्या दाखल्यावर मारला. उज्वला थिटे ही महिला यशवंत मानेंकडे दाद मागायला गेली होती. माझी शेती सगळी जाळून टाकली. माझ्या मोटारी पळवून नेल्या, पाईपलाईन तोडून टाकली. माझ्या घरावर दरोडा टाकला. त्या प्रकरणी राजन पाटील आणि त्यांच्या दोन मुलांवर संबंधित महिलेने पोलिस ठाण्यात लेखी आरोप केला आहे. फिर्यादीत त्यांचा उल्लेख आहे. पण, त्यांच्यावर गुन्हा दाखल झालेला नाही, असेही पाटील यांनी नमूद केले.

### यशवंत मानेंचं गणित कच्चं

यशवंत माने यांच्याकडे तिने दहा लाख रुपये मागितले म्हणून सांगता? नवी कोरी गाडी मागितली असे असता का? दहा लाख आणि गाडीची किंमत किती होते, फार तर २५ ते ३० लाख होतात. म्हणजे आमच्याकडून आरोप करण्यासाठी ५० लाख आणि आरोप थांबवण्यासाठी ३० लाख रुपये, अशा पद्धतीचा उलटा व्यवहार असतो का? यशवंत माने यांचं गणितही कच्चं आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.

### 'उज्वलां'ची आव्हानात्मक पोस्ट; 'पुराव्यासह जनतेसमोर तुमचा चेहरा उघडा पाडेन'

यशवंत मानेंनी आरोप केल्यानंतर उज्वला थिटे-पाटील यांनी सगळे आरोप फेटाळून लावत मानेंना आव्हान दिलं आहे. तशी पोस्ट त्यांनी सोशल मीडियावर झळकावली आहे, त्या म्हणतात... मोहोळच्या जनतेला माझं सांगणं आहे की, जी काही बातमी उठवली गेली, त्या संदर्भातील उत्तर मी गल्लीबोळातील कार्यक्रमात बोलतात तसं बोलून दाखवणार नाही. लोकशाही मार्गाने सोलापूर किंवा मुंबईत रितसर पत्रकार परिषद घेऊन उत्तरे देईन. यशवंत माने याचं आणि माझं वैर नव्हतं. मात्र माझ्या प्रश्नांची उत्तरं त्यांनी दिली नाहीत तर मुंबईच्या आझाद मैदान उपोषणसाठी आहेच. १० महिने मी शांत होते, तुम्ही सुरुवात केली तर आता धमाका होऊच द्या. २८ एकर जमीन, घर, दार, शिक्षण, पैसा सोडून मरणाला उदार होऊन मायलेकरं फिरत आहेत. तुमच्यासारखं निलट, लाचारी पत्करणारी ही आई नाही. आ. माने पुराव्यासह तुमचा चेहरा जनतेसमोर उघडा पाडेन, तेही आझाद मैदानावर... या भेट द्यायला लवकरच...

# 'सावंत'शाहीका भी हो गया पुरा फायनल!

सोलापूर/प्रतिनिधी

कित्येक दशकं राज्याच्या राजकारणात महत्त्व राहिलेल्या आणि काँग्रेस-राष्ट्रवादीला बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या साखरपट्टा आणि सहकार पंढरी सोलापूर जिल्ह्यात भाजपची ताकद वाढत आहे. या पक्षाचं 'कमळ' चांगलंच फुलत आहे. सावंत परिवाराचे नेते प्रा. शिवाजी सावंत आणि त्यांचे सुपुत्र पृथ्वीराज आणि ऋतुराज यांच्या भाजप प्रवेशाला बुधवार (ता.१२) चा मुहूर्त लागत आहे.तत्पूर्वी मोहोळचे माजी आमदार राजन पाटील आणि माढ्याचे माजी आमदार बबनराव शिंदे या बड्या प्रस्थापितांचा भाजप प्रवेश झाला आहे. यावरुन जिल्ह्यात भाजपची ताकद दिवसेंदिवस वाढत आहे. 'कमल' खिले परिस्थिती राहात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षांतराचा मोठा फायदा भाजपला होईल, असं मानलं जातंय.





## लोग आते रहे, 'कमल' खिलता रहा; और भाजप का कारवा बडता रहा!

सोलापूर जिल्ह्यात शिवसेना शिंदे गटाला मोठा धक्का बसला आहे. सोलापूर जिल्ह्यातील एका बड्या नेत्याचा भाजपमध्ये प्रवेश होणार आहे. सोलापूर जिल्हा शिवसेनेचे माजी जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी सावंत हे भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. शिवाजी सावंत हे मुंबईत भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत प्रवेश करणार आहेत. स्वत: शिवाजी सावंत यांनी याबाबतची माहिती दिली आहे.

### उलट-सुलट चर्चांना पूर्णविराम

गेल्या काही दिवसापासून सोलापूर जिल्ह्यात 'ऑपरेशन लोटस' सुरुच आहे. यामध्ये आणखी भर पडली आहे. शिवसेनेचे माजी जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी सावंत हे भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. गेल्या काही दिवसांपासून शिवाजी सावंत हे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरु होती. अखेर त्यांच्या पक्ष प्रवेशाचा मुहूर्त सापडला आहे. त्यामुळं आता चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. माझ्याबरोबर सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील कार्यकर्ते भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती शिवाजी सावंत यांनी दिली आहे.

# उमेदवारी हवी ना? या रांगेत, करा अर्ज!

सोलापूर /प्रतिनिधी

भाजपने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी संघटनात्मक जिल्हा व महापालिका क्षेत्रनिहाय निवडणूक प्रमुख व प्रभारींची नियुक्ती करत महायुतीतील घटक पक्षांना शह दिला आहे. त्यानंतर नगरपरिषद व नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी उमेदवार निवडीची प्रक्रियेचा नारळ फोडत मित्रपक्षांच्या तुलनेत आघाडी घेतली आहे. जिल्ह्यातील ११ नगरपरिषदा व एक नगरपंचायतीसाठी शुक्रवारपासून (ता. ७) तीन दिवस इच्छुकांकडून अर्ज स्विकारण्याला सुरुवात झाली आहे.

नगरपरिषद-नगरपंचायत निवडणूक जाहीर झाल्यानंतर प्रदेश भाजप ॲक्शन मोडवर आले आहे. बुधवारी (ता. ५) निवडणूक प्रमुख, प्रभारींची घोषणा केल्यानंतर लागलीच गुरुवारी (ता. ६) प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी राज्यातील सर्व शासकिय जिल्ह्यांसह महापालिका क्षेत्राचे निवडणूक प्रमुख, प्रभारी, जिल्हाध्यक्ष व शहराध्यक्ष, सरचिटणीस यांची ऑनलाईन बैठक घेतली. या बैठकीत प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांच्यासह रवींद्र अनासपुरे, सुधीर देऊळगावकर यांनी निवडणूक तयारीसह उमेदवारी अर्ज भरण्यापासून निवडणूक निकालानंतर उमेदवारांचे खर्च सादर करण्यापर्यंतच्या तांत्रिक बाबींविषयी मार्गदर्शन केले.



### सोमवारी अर्जांचा फैसला

सात ते नऊ नोव्हेंबर या कालावधीत नगरपरिषद-नगरपंचायत निवडणूक लढविण्यास इच्छुक उमेदवारांचे अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. त्यानंतर १० नोव्हेंबर रोजी त्यांची पडताळणी केली जाणार आहे.

# आबा; मग कसं ओ? कार्यकर्ते म्हणत्याल तसं!

- साळुंखेंचे युतीसाठी कोणाच्या 'हातात हात?'
- सांगोल्याचं राजकारण नव्या राजकीय वळणावर

सोलापूर/प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या धुमशानामध्ये सांगोला तालुक्याचं राजकारण वेगळ्या आणि निर्णायक वळणावर गेलं आहे. इथल्यानगरपरिषेदच्या निवडणुकीचं राजकारण तापलं असताना माजी आमदार दीपक साळुंके यांच्या चर्चांमुळे या तालुक्यातील राजकिय वातावरणात चैतन्य निर्माण झाले आहे. त्यांच्या गटाची भूमिका जाहीर होताच आगामी निवडणुकीचे राजकारण नव्या वळणावर जाण्याची चिन्हे दिसत आहेत.

सांगोला शहर तसेच परिसरात अनेक वर्षे एकत्रितपणे कार्यरत राहिलेले ज्येष्ठ सहकारी, नगरपालिका निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक उमेदवार आणि प्रमुख कार्यकर्त्यांशी चर्चा करूनच आगामी निवडणुकीसंदर्भात पुढील दिशा निश्चित करण्यात येईल, तसेच युती किंवा आघाडीबाबतचा निर्णयही या बैठकीतच ठरवला जाईल, असे प्रतिपादन माजी आमदार दीपक साळुंखे यांनी केले. यावेळी झालेला विधानसभा निवडणुकीमध्ये माजी आमदार साळुंखे यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेकडून निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत साळुंखे यांना सुमारे पन्नास हजारांपेक्षा जास्त मते मिळाली होती. निवडणुकीनंतर त्यांनी कोणत्याही पक्षाशी संलग्न न राहता काम सुरू ठेवले होते. सध्या ते भाजप किंवा इतर कोणत्या पक्षात जातात याकडे चर्चांना जाणारे आहे. गतनगरपालिका निवडणुकीत सांगोला शहरात सर्वाधिक नगरसेवक निवडून देत साळुंखे यांच्या गटाने आपले बळ दाखवले होते. त्यामुळे या निवडणुकीत साळुंके कोणत्या पक्षासोबत किंवा गटासोबत आघाडी करतात, हे सांगोला नगरपरिषदेच्या राजकारणातील समीकरण ठरवणारे ठरणार आहे.



### कार्यकर्त्यांच्या जीवावर माझं राजकारण; त्यांच्या भावनेची कदर करुनच निर्णय

यावेळी बोलताना माजी आमदार साळुंखे पाटील म्हणाले, 'गेली ३५ वर्षे राजकारणात कार्यरत असताना मी नेहमीच माझ्या जिवाभावाच्या सहकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना केंद्रस्थानी ठेवले आहे. प्रत्येक निर्णयात त्यांचा सल्ला आणि विश्वास हा माझा आधार राहिला आहे. सांगोला नगरपालिकेच्या निवडणुकीतही प्रभागनिहाय इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेऊनच आपण पुढील दिशा ठरवू. कार्यकर्त्यांच्या मतांचा आणि भावनांचा आदर राखूनच कोणत्या पक्षासोबत युती किंवा आघाडी करायची, हे ठरवले जाईल.